दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.१८ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २६२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 18 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 262 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# महापालिका निवडणुकांची दहीहंडी महायुतीच फोडणार:उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास

## विधानसभेला आम्ही २३२ थर लावले; ठाणे ही गोविंदांची पंढरी

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात मागील अडीच वर्षांत मी मुख्यमंत्री म्हणून केलेले काम जनतेसमोर आहे. त्याच बळावर विधानसभेत महायुतीला ऐतिहासिक यश मिळाले. आम्ही २३२ थर लावून विधानसभेची हंडी फोडली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महायुती दहीहंडी फोडणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. ते आज ठाणे येथे माध्यमांशी बोलत होते.मुंबईसह राज्यात आज दहिहंडीचा उत्साह आहे. ठाणे शहरात टेंभी नाका मित्र मंडळाच्या वतीने देखील दहीहंडी उत्सावाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुपारी हजेरी लावली. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना उपरोक्त विश्वास व्यक्त केला.राज्यात मागील अडीच वर्षांत मुख्यमंत्री म्हणून मी जे काम केले, ते राज्याला माहीत आहे. त्यामुळे विधानसभेला महायुतीला ऐतिहासिक विजय मिळाला. आम्ही २३२ थर लावून विधानसभेची हंडी फोडली. आता देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली दुसरी इनिंग सुरू झालेली आहे. कामही त्याच वेगाने सुरू आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची हंडी देखील महायुतीच फोडेल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. दहीहंडी म्हणजे जीवघेणी स्पर्धा नाही, तर ही आपली संस्कृती आणि परंपरा वाढवण्याचा सण आहे. हजारो-लाखो गोविंदा ठाण्यात येतात. त्यामुळे ठाणे ही गोविंदांची पंढरी झालेली आहे. आनंद दिघेंच्या मानाच्या हंडीचे वेगळे वैशिष्ट्य आहे. ती परंपरा आजही काय राखण्याचा प्रयत्न आमच्या कार्यकर्त्यांनी केला, असेही शिंदे यांनी यावेळी नमूद केले.



### विरोधक विकास विरोधी थर लावतात

**आमचा अजेंडा विकासाचा आहे. आम्ही विकासाचे थर लावले. पाकिस्तानच्या गर्वाची हंडी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैन्याने फोडली, याचा आम्हाला अभिमान आहे. आपल्या भारतीय लष्कराने पाकिस्तानला जशास तसे ठोक उत्तर दिले. समोरचे लोक विकासविरोधी थर लावतात. त्यामुळे आम्ही विधानसभेची हंडी फोडली, अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला.**

# नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या–खा.रजनीताई

**केज । प्रतिनिधी**

चार दिवसापासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर खा. रजनीताई पाटील यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे. शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे. पाऊस,नैसर्गिकआपत्ती मुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. नुकसानग्रस्त भागांचा तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल.त्यामुळे प्रशासनाने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा.रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळेपर्यंत पाठपुरावा करत राहणारअसल्याचे त्यांनी सांगितले.



# गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या एस.पीं.च्या निषेधात माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या विशेष प्रसंगी, माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक अनोखा निषेध नोंदवला. त्यांनी गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधीक्षकाचा फोटो गळ्यात अडकवून निषेध केला. यावेळी त्यांची पत्नीही उपोषणात सहभागी झाल्या.गेल्या अनेक दिवसांपासून विविध पद्धतींनी आंदोलन करण्यात येत असूनही न्याय न मिळाल्यामुळे वाघमारे यांनी हे पाऊल उचलले आहे. बीड तालुक्यातील शिवनी येथील गट नंबर ६६२ या ठिकाणी ते गायरान शेती करत आहेत आणि त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह




अन्नधान्य पिकवून होतो. अलीकडे त्यांच्या घरातील शेड पाडून त्यांच्यावर अन्याय झाल्याची घटना घडली आणि याबाबत संबंधित आरोपींवर कारवाई नाही झाल्याने त्यांचा निषेध करण्यासाठी वाघमारे यांनी हा उपाय केला. मारहाणीचे व्हिडिओ उपलब्ध असूनही कारवाई न झाल्याने त्यांनी पोलीस अधीक्षकांचा फोटो गळ्यात घालून न्यायाची मागणी केली. या घटनेद्वारे त्यांनी गुन्हेगारांवर कारवाई करण्याची आणि गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.


# निवडणुका जवळ आल्या की मराठी-मराठीचा नारा लावतात:गिरीश महाजनांचा ठाकरेंना टोला

**नाशिक (वृत्तसंस्था)**–भाजप नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकारांशी संवाद साधत अनेक मुद्यांवर भाष्य केले आहे. तसेच ठाकरे बंधू एकत्र येत मराठी मतांची वज्रमूठ बांधणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत, यावर निवडणुका जवळ आल्या की मराठी मराठीचा नारा लावायचा आणि मराठी मते काय आमची नाहीत का? असा सवाल उपस्थित करत टोला लगावला आहे.गिरीश महाजन म्हणाले, विकास करायचा असेल तर महायुती सरकारच करू शकते आणि ही लोकांचीही मानसिकता झाली आहे. त्यामुळे कोणीही एकत्र येऊ द्या, निवडणुकांचे निकाल लागल्यावर मग बघू, असे म्हणत महाजन यांनी ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या चर्चांवर भाष्य केले आहे. तसेच मराठी मते काय आमची नाहीत का? विधानसभेत आपण पहिलेच आहे विक्रमी मतांनी आम्ही विजयी झालो होतो. आम्ही भेदभाव करतच नाही. आणि ते निवडणुका आल्या की मराठीचा मुद्दा काढतात, असा टोला ठाकरेंवर लगावला.पुढे बोलताना गिरीश महाजन म्हणाले, लोकशाहीत कोणीही कोणाबरोबरही जाऊ शकते. परंतु, लोकांना हे माहीत झाले आहे की आपला विकास कोण करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आपण प्रगती करत आहोत. कोणी कितीही वल्गना केल्या तरी त्याचा उपयोग होणार



नाही. तसेच राज ठाकरे यांना जवळ घेण्याचा प्रयत्न केला जात आहे का? असा प्रश्न विचारला असता महाजन म्हणाले यावर मला काही माहीत नाही, देवेंद्र फडणवीस यात लक्ष घालतील.एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांना जळगावकडेही लक्ष असू द्या म्हणत डिवचले होते. त्यावर प्रत्युत्तर देताना गिरीश महाजन म्हणाले, काळजी करू नका, माझे सगळीकडे लक्ष आहे. संपूर्ण उत्तर महाराष्ट्राकडे माझे लक्ष आहे. जळगाव असू द्या, धुळे असू द्या, नाशिक असू द्या, नगर असू द्या, तिथल्या जिल्हा परिषद असू द्या, नगरपालिका असू द्या किंवा महानगरपालिका असू द्या. त्यांनाच तुम्ही विचारा निवडून आणताय म्हणून, असे महाजन म्हणाले.

# मांजरा नदीवरील अनेक गावांमध्ये अतिवृष्टीने पिकांसह शेतीचे मोठे नुकसान तातडीने पंचनामे करा-आ.नमिता मुंदडा



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मांजरा काठावरील अनेक गावांमध्ये दि.१५ ऑगस्ट रोजी पहाटे जिल्ह्यातील जवळपास १७ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाली असून याठिकाणी पिकांसह शेतीचेही नुकसान झालेले आहे. अनेक ठिकाणी शेती खरडून गेलेली असून जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, असे पत्र आ. नमिता मुंदडा यांनी जिल्हा कृषी अधीक्षक, बीड, तहसीलदार केज व तालुका कृषी अधिकारी केज यांना दिले आहे.मागील चार दिवसांपासून बिड जिल्ह्यात पाऊस हजेरी लावत असून दि.१५ ऑगस्ट रोजी पहाटे पावसाने बीड जिल्ह्यात हाहाकार केला आहे. केज तालुक्यातील युसूफवडगाव, बनसारोळा, नांदूरघाट, महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. याच बरोबर दि.१६ ऑगस्टच्या रात्रीही पावसाने हजेरी लावली असून इतर अनेक ठिकाणी सुद्धा पिके पाण्यात आहेत. तर काही ठिकाणी नदीचे पात्र ओलांडून पाणी शेतात शिरले आहे. केज तालुक्यातील मांजरा नदी दुथडी भरून वाहत असून राजेगाव, दैठणा, पिट्टीघाट,बोरगाव, भोपला, हदगाव, डोका , लाखा व शिरुरघाट या गावासह संपूर्ण मांजरा पट्ट्यातील गावे क्षतीग्रस्त झालेली आहेत. शेतीच्या नुकसानी सोबतच घरांची पडझड झाल्याच्या घटना घडल्या आहेत. नदीपात्र ओलांडून पाणी पिकात व गावांत शिरले आहे. यामुळे पिकांचे, शेतीचे आणि रहिवाशी घरांचेही नुकसान झालेले आहे. यामुळे या भागात जिल्हा कृषी अधीक्षक बीड, तहसीलदार केज, तालुका कृषी अधिकारी केज यांनी तातडीने लक्ष द्यावे, तातडीने पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे आवश्यक असून नुकसानग्रस्त भागात तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांमार्फत पंचनामे करुन शासनाकडे नुकसान भरपाईसाठी प्रस्ताव सादर करावेत, असेही आ. नमिता मुंदडा यांनी पत्रात म्हटले आहे.



# शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून विकास साधणार:पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर (वृत्तसंस्था)**–लातूर जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. यामाध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधून नागरिकांना गुणवत्तापूर्ण आणि कालबद्ध सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, असे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री भोसले बोलते होते. प्रारंभी पालकमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बांधव, विद्यार्थी, पालक व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्ह्यातील पायाभूत सुविधा बळकटीकरणाला गती देण्यात आली आहे. लातूर शहराच्या २९० कोटींच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेला मंजुरी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली आहे. तसेच जिल्ह्यात जलसंधारण आणि शेती क्षेत्राच्या विकासासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड योजना, जलयुक्त शिवार अभियान आणि गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार यासारख्या योजनांमुळे शेतीला बळ मिळत असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. जिल्ह्यातील शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत आतापर्यंत ८८२ किलोमीटर लांबीचे ६७८ रस्ते अतिक्रमणमुक्त झाले आहेत. लवकरच या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

## संपादकीय

# परिणामहीन चर्चा



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यात नुकतीच चर्चा झाली. मात्र काहीही ठोस परिणाम न निघताच संपलीही, पण यातून एक भारतासाठी चिंता वाढली आहे. कारण या चर्चेतून भारतावरील टॅरिफचे संकट अधिक गहिरे झाले आहे. 'भारत आमचा मित्र असला तरी...' असं म्हणत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला मोठा धक्का दिला आहे. अमेरिकेने भारतावर २५ टक्के आयात शुल्क लागू केले आहे. दोन्ही देशातील व्यापार कराराच्या वाटाघाटी काही मुद्द्यांवर अडकल्याने ट्रम्प यांनी ही घोषणा केली. इतकेच नाही तर रशियाकडून लष्करी साहित्य आणि तेलाची खरेदी यामुळे भारतावर दंडही लावला जाईल अशी भूमिका घेतली. भारत हा रशियाचा खरेदीदार देश आहे हे योग्य नसून भारताला २५ टक्के आयात शुल्क आणि वर तेवढाच दंडही आकारला जाईल, अशी घोषणा ट्रम्प यांनी केली. अमेरिकेच्या या निर्णयामुळे भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूवरील कर वाढणार आहेत. जर भारतातून अमेरिका १०० रुपयांची एखादी वस्तू आयात करत असेल, तर यापुढे त्यावर २५ टक्के आयात शुल्क लावले जाईल. याचा अर्थ अमेरिकन ग्राहकांना ती वस्तू १२५ रुपयांना घ्यावी लागेल. त्यामुळे अमेरिकेत भारतीय वस्तूंच्या किंमती वाढतील आणि त्याचा फटका भारतीय उद्योगांना बसेल.अलास्का येथील एका ठिकाणी दोन्ही जागतिक महासत्तांमध्ये चर्चा झाली आणि ती निष्फळ ठरली ही भारतासाठी दिलासादायक बाब आहे असे काहींनी म्हटले तर काहींनी भारतासाठी आता टॅरिफचा धोका खूप वाढला आहे असे म्हटले. अमेरिकन अर्थमंत्री स्कॉट बेसेट यांनी म्हटले आहे, की जर ही शिखर परिषद परिणामहीन राहिली, तर भारतावर अमेरिकेचे टॅरिफ आणखी वाढू शकेल. अजून याबाबत अंतिम निर्णय झाला नाही. पण तशीही शक्यता आहे. या शिखर परिषदेनंतर दोन्ही नेत्यांनी आमची चर्चा चांगली झाली असे म्हटले असले तरीही त्याच्यातून परिणाम काहीही न निघाल्याने भारताच्या तेलपुरवठ्याबाबत निश्चितच संकटाचे ढग दाटले आहे. कारण अमेरिकेने रशियावर निर्बंध लादले, तर भारताला रशियाकडून तेल खरेदी करणे बंद करावे लागले. त्या परिस्थितीत भारताकडे पर्याय आहेत याचा विचार केला असता मध्य पूर्वेतून तेल आयात करणे हा एक पर्याय आहे. पण तो जास्त महाग आहे. खुद्द अमेरिकेकडून तेल खरेदी करणे हा एक पर्याय आहे पण तो तितका लाभप्रद नाही. आफ्रिकेकडून भारत तेल खरेदी करू शकतो पण तोदेखील पर्याय भारतासाठी महाग आहे. रशियाकडून भारत स्वस्तात तेल आयात करत होता आणि त्यामुळे भारतातील अर्थव्यवस्थेला चांगला आधार मिळाला होता. पण याचा लाभ सामान्य माणसांपर्यंत पोहोचला नव्हता. तेलाचे दर प्रचंड चढलेले होते. त्यामुळे भारताने जर रशियाकडून तेल खरेदी करणे अमेरिकेच्या दबावाखाली येऊन बंद केले, तर भारतात पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढवावे लागतील. एकूणच ही स्थिती भारतासाठी चिंताजनक आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे आणि युक्रेन यांच्या लोकांना ठार मारण्यास सहाय्य करत आहे असा ट्रम्प यांच्या युक्तीवादामागे अर्थ आहे. अर्थात भारताने ट्रम्प यांचा इशारा दुर्लक्ष करण्यासारखे आहे. पुतीन यांच्यावर पाश्चात्य देशांनी प्रतिबंध लावले आहेत आणि जागतिक न्यायालयाने त्यांना अटक करण्याचे वॉरंट बजावले आहे. पण अमेरिकेच्या टॅरिफच्या धोक्यातच भारतासाठी एक अत्यंत महत्त्वाचा संदेश आहे तो म्हणजे चीनला ट्रम्प धमकावू शकत नाही. म्हणून त्यांचा डाव आहे, की भारताला रशियापासून अलग करणे. रशिया भारतासोबत मैत्रीला सातत्याने जागत आला आहे. अगदी अमेरिकेने भारतीय समुद्रात सारे आरमार आणून ठेवले होते तेव्हाही रशियानेच त्यांच्या फ्लीटच्या युद्धनौका अरबी समुद्रात आणल्या होत्या आणि त्यामुळे अमेरिकेचे आरमार जसे आले तसे गूपचूप गेले. त्यामुळे ट्रम्प यांनी कितीही प्रयत्न केले तरीही भारत हा रशियाच्या मैत्रीला जागणारा देश आहे.भारताने ट्रम्प आणि पुतिन यांच्यातील भेटीचे स्वागत केले आहे, पण त्यामुळे ट्रम्प भारतावर टॅरिफ लादणार की नाही याबाबत अद्याप संदिग्धता कायम आहे. कारण अजूनही ट्रम्प यांनी भारताकडून आयात केल्या जाणाऱ्या मालावर सरसकट २५ टक्के आयात कर लावण्याची घोषणा केली आहे. आणखी ती २५ टक्के वाढवण्याचा प्रस्ताव होता. जर अमेरिकेने तसा निर्णय घेतलाच, तर भारतासाठी ही चांगली बातमी नसेल. कारण मग भारतावर एकूण टॅरिफ ५० टक्के होईल आणि भारताची अर्थव्यवस्था आज चांगल्या अवस्थेत आहे ती गटांगळ्या खाईल. अमेरिकन अर्थमंत्र्यांनी ट्रम्प सेकंडरी टॅरिफ म्हणजे दुय्यम कर लागू करू शकतात असे म्हटले होते पण भारताने या म्हणण्याला किरकोळ म्हणून निकालात काढले होते. पण या समीटचे परिणाम भारतावर जास्त होणार आहेत, कारण प्रश्न तेलाचा आहे. भारत तेलाच्या बाबतीत अजूनही दुर्दैवाने स्वयंपूर्ण नाही आणि त्यामुळे त्याला इतरांवर तेलासाठी अवलंबून राहावे लागते. ट्रम्प यांची भारतावरील नाराजी यासाठी आहे कारण ते रशियाकडून तेल खरेदी करून रशियाच्या अर्थव्यवस्थेला आधार देत आहे. पण कोणताही देश आपला फायदा आधी पाहणार हे ट्रम्प यांना लक्षात यायला हवे. ट्रम्प यांच्या टॅरिफ युद्धात भारतासारखा विकसनशील देश भरडला जात आहे. भारतावर ट्रम्प यांचा आरोप आहे की भारत रशियाकडून तेल खरेदी करून त्या देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देत आहे. पण रशिया आणि अमेरिका या जागतिक ताकदवान देश राहिलेल्या देशांच्या युद्धात भारतासारखा देश भरडला जात आहे हे वास्तव आहे. ट्रम्प यानी भारतावर टॅरिफ लादल्याने भारतापुढे अवघड पर्याय आहे. भारताकडे आता फारसे पर्याय नाही, एक तर प्रत्युत्तर देणे आणि रशियन तेल आयात थांबली तर काही दिलासा देणे हे ते पर्याय आहेत. एकूणच ट्रम्प आणि पुतिन यांच्यातील चर्चेचे फलित काहीच निघाले नसले तरीही भारतासाठी ही बातमी चिंता वाढवणारी आहे.

### मौजे खानोटा, येथील क्रमांक ५०४ ते ५०७ मधील शिल्लक १२८ घरांचे संपादन व पुनर्वसन करणेबाबत

# घरांचे पुनर्वसन करण्यासाठी आमदार ॲड राहुल कुल,यांनी जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील,यांची घेतली भेट



**दौंड । प्रतिनिधी**

(जि. पुणे) विधानसभा मतदार संघाशी निगडीत जलसंपदा विभागाच्या विविध विषयांबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री मा. नामदार डॉ. राधाकृष्णजी विखे पाटील साहेब यांच्या उपस्थितीत नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अपर मुख्य सचिव दिपक कपूर साहेब, कार्यकारी संचालक हनुमंत गुनाले साहेब, मुख्य अभियंता हनुमंत धुमाळ साहेब यांच्यासह जलसंपदा विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. यावेळी खालील मुद्द्यावर चर्चा करण्यात आली जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे व अस्तरीकरण करणेच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याची मागणी केली - विस्तार व सुधारणा अंतर्गत जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेंतर्गत कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणाली मध्ये रूपांतरण करणे यासाठी सुमारे ४२९.८६ कोटी किंमतीच्या प्रस्तावास दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी मंत्रीमंडळ बैठकीत तत्वतः मान्यता दिली असून, संकल्पन मंजुरीनंतर निविदा प्रसिद्ध करण्यात येईल असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले. पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कुपटेवाडी, ता. दौंड येथील वितरिकेच्या वरील बाजूस वंचित भागाच्या सिंचनासाठी नवीन पाईप लाईन करणेसाठी निधी उपलब्ध करणेबाबत - याबाबत सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून, दौंड तालुक्यातील १४ गावे वंचित असून, त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्याचे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याचे आदेश मा. मंत्री महोदयांनी दिले. मुळशी धरणाचे पाणी खडकवासला धरणाच्या खोऱ्यात वळविण्याबाबत - याबाबत सर्व उक्त पर्यायांवर चर्चा झाली असून, ९ ते १० ढचउ पाणी पिण्यासाठी वळविणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला असून,त्यास लवकरच मान्यता देण्यात येईल असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले. दौंड (जि. पुणे) तालुक्यातील उजनी धरणाच्या बॅक वॉटरमध्ये बॅरेज बांधणेसाठी सुधारित धोरण ठरविणेबाबत व बॅरेज बांधणेसाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी केली - यामध्ये कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, ठिकाणांचे सर्वेक्षण करून त्यांचे अहवाल लवकर सादर करावा अशा सूचना मंत्री महोदयांनी केल्या आहेत.

दौंड (जि. पुणे) तालुक्यातील चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनीने सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करणेबाबत व त्यास मान्यता मिळणेबाबत - याबाबत पाझरचरचे मापदंड मंजुरीसाठी वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले असून पुढील आठवड्यात वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक घेऊन महिनाभरात मापदंड ठरविणेबाबत प्रस्तावांना मान्यता देण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले खडकवासला ते फुरसुंगी बंदनळी कालवा व जुना मुठा उजवा कालवा (बेबी कॅनॉल) यांना राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी व सुरु असलेली कामे यांचा आढावा - पर्यावरण विषयक मान्यता मिळाली असून, ऑगस्ट २०२५ मध्ये काम पुर्ण करुन बोगद्याचे काम सुरु करणेचे नियोजित आहे मंत्री महोदयांनी सांगितले, तसेच बेबी कॅनॉलचे काम देखील लवकरच पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.मौजे खानोटा, ता. दौंड, जि.पुणे येथील क्रमांक ५०४ ते ५०७ मधील शिल्लक १२८ घरांचे संपादन व पुनर्वसन करणेबाबत - घरांचे पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून, तातडीने पूर्ण करून नागरिकांना दिलासा देण्यात येईल असे आश्वासन यावेळी मा. मंत्री महोदयांनी दिले.

### मुंबई मराठी पत्रकार संघात आचार्य अत्रे पुरस्कारांचे शानदार वितरण

# जेष्ठ पत्रकार कुमार कदम आणि रमेश झवर यांना पद्मभूषण राम सुतार यांच्या हस्ते आचार्य अत्रे पुरस्कार प्रधान



**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनतेला अभिमान वाटावा अशा उत्तुंग शिल्पातून भारतीय संस्कृतीचे भव्य आणि तेजस्वी आविष्कार घडविणारे प्रसिद्ध शिल्पकार पद्मभूषण राम सुतार यांच्या हस्ते पत्रकारीतेत आपल्या ओजस्वी वाणीने आणि प्रखर लेखणीने अतुलनीय कार्य करणारे ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम आणि रमेश झवर यांना मराठी पत्रकार संघाच्यावतीने आचार्य अत्रे यांच्या कन्या लेखिका शिरीष पै यांनी दिलेल्या देणगीतून हा अत्यंत प्रतिष्ठेचा असा पुरस्कार आचार्य अत्रे यांच्या जयंतीनिमित्त मुंबई मराठी पत्रकार संघाच्यावतीने सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला शाल, श्रीफळ, रुपये ११०००/-, आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. रमेश झवर यांना २०२४ सालचा तर कुमार कदम यांना २०२५ सालच्या पुरस्काराने बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी सन्मानीत करण्यात आले. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून भूषण राम सुतार हे उपस्थित होते. मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण,विश्वस्थ ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, देवदास मटाले, नवनियुक्त विश्वस्थ अजय वैद्य, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, कोषाध्यक्ष जगदीश भोवड, आदी मान्यवर उपस्थित होते.वृत्तपत्र क्षेत्र ५४ वर्षे कार्यरत असलेले कुमार कदम यांनी विद्यार्थी दशेत असल्यापासून पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय आणि भरीव असे योगदान दिले आहे. लोकसत्ता'मध्ये रविवारच्या अंकात 'ज्ञान मंदिरातील लाचखाऊंना आवरा' अशा शिर्षकाखाली लेख लिहून शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचारी व्यवस्थेवर आपल्या लेखणीतून आसूड ओढले होते. शाळा संस्थाचालकांकडून प्रवेशासाठी उकळण्यात येणाऱ्या वारेमाप फिच्या विरोधातही त्यांनी पहिल्या प्रथम आवाज उठवला होता. 'रत्नभूमि' या रत्नागिरी जिल्ह्यातून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकातून १९७२ मध्ये त्यांनी पत्रकारितेला सुरवात केली.त्या नंतर मुंबईतील वार्ताहर म्हणूनही त्यांनी रत्नभूमि साठी दहा वर्षे काम केले. याच काळात त्यांचे 'साप्ताहिक मार्मिक'मधून महापालिकेत 'एक नजर' हे सदर खूप गाजले होते. त्या आणिबाणीनंतरच्या काळात 'हिन्दुस्थान समाचार' या भाषिक वृत्तसंस्थेत ते १२ वर्षे वार्ताहर होते. महाराष्ट्र वृत्त सेवा (महावृत्त) या संस्थेची १९९९ मध्ये स्थापना केल्यानंतर त्यांनी या संस्थेचे तसेच संस्थेच्या 'महावृत्त डॉट कॉम' या संकेतस्थळाचे मुख्य संपादक म्हणूनही जबाबदारी सांभाळली होती. दैनिक पुढारी (कोल्हापूर), दैनिक तरुण भारत (बेळगाव) यांचा विशेष प्रतिनिधी म्हणूनही त्यांनी मुंबईत दहा वर्षे पत्रकारिता केली. दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स'मधील 'मराठी मुलखात कोकण' हे कोकणातील विविध विषयांवर सडेतोड भाष्य करणारे कुमार कदम यांच्या सदरला वाचकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. जुलै २००१ ते सप्टेंबर २०१४ अशी सलग १३ वर्षे स्तंभलेखक म्हणून त्यांनी सातत्यपूर्ण लिखाण केले. सेझ प्रकल्पा मुळे उद्भवणारे धोके त्यांनी महाराष्ट्र टाइम्सच्या माध्यमातून जनतेसमोर आणले. ज्येष्ठ पत्रकार रमेश झवर यांनी प्रत्यक्ष आचार्य अत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली दैनिक 'मराठा'मध्ये काम केले. झवर हे पन्नास वर्षांहून अधिक काळ पत्रकारितेत सक्रिय असून. दैनिक 'मराठा' ते दैनिक 'लोकसत्ता' असा त्यांनी झंझावाती प्रवास केला आहे.या कालावधीत उपसंपादक, वार्ताहर, मुख्य उपसंपादक, वृत्तसंपादक, सहसंपादक अशा पदांवरही त्यांनी काम केले आहे. दैनिक 'लोकसत्ता'मध्ये व्यापार उद्योग पुरवणी (कॉमर्स विभाग) व प्रादेशिक विभाग हेही त्यांनी सक्षमपणे सांभाळले होते. संपादकीय पानावरील लेख, स्फुट तसेच लोकसत्ताचे अनेक अग्रलेखही त्यांनी लिहिले आहेत. निवडणुका, साहित्य संमेलने, देश विदेशातील महत्त्वाच्या घडामोडींचे त्यांनी वृत्तांकन केले आहे. वयाची ८० वर्षे पार केलेल्या झवर यांनी मुंबई मराठी पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष म्हणूनही अनेक वर्षे ते कार्यरत होते. कुमार कदम हे आता सामाजिक स्तरावर अवयवदान विषयक जनजागृती करण्याचे सेवाभावी कार्य राज्यस्तरावर करत आहेत. दूरदर्शनवर मराठी कार्यक्रमाची होणारी गळचेपी रोखण्यासाठी १९८३ साली मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष असताना त्यांनी मंत्रालयावर मोर्चा काढला होता.कुमार कदम यांच्या नेतृत्वातील त्या मोर्चात सुधीर फडकेपासूंन अनेक दिग्गज त्यात सामिल झाले होते. परिणामी सह्याद्री वाहिनीवरून मराठी कार्यक्रमांना प्राधान्य मिळू लागले. त्याचबरोबर मुंबई मराठी पत्रकार संघातील सदस्यांच्या दहावी बारावी परिक्षेत यश मिळवलेल्या मुलांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. चेताली मिलिंद वाघमारे,( दहावी ९५. ८०% ) सांची अनंत धनसरे ( दहावी ९५. ४०%) अवनी संजय स्वाती घोसाळकर (दहावी ८०%) अथर्व सचिन गोखले( दहावी८२. ८०% ) अवनी राजेंद्र साळसकर ( दहावी ७६. ८०%) नेत्रा ऋषिक देशपांडे ( बारावी ८६. ३३) कस्तुरी विश्वनाथ खंदारे ( बारावी ७८. ३३%) विभूती अनिल चव्हाण ( बारावी ७३% ) वेदांत अशोक शिंदे(५७. १७% ) डॉ. प्राजक्ता दीपक भादरे, अथर्व संतोष मालवणकर, विनय अनिल चव्हाण, मैत्रेय देवदास मटाले, विनल राजन कोकाटे, अश्रफ हश, अनुष्का किरीट किरण मोरे, नयना अशोक शिंदे, विनायक राजेंद्र वर्षा ओझे ( दहावी८६. ४०%) जिया जमीर आशिया काझी ( दहावी८९. ४०% ) आदी विद्यार्थ्यांचा पद्मभूषण राम सुतार यांच्या हस्ते ट्रॉफी आणि विद्यार्थ्यांचे नाव असलेले पेन देऊन त्यांना गौरविण्यात आले.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेलमध्ये भव्य तिरंगा यात्रा



**पनवेल । प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी पनवेल शहर मंडलाच्या वतीने आज पनवेलमध्ये भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेत प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी सहभाग घेतला.यावेळी तिरंगा हातात घेऊन भारतमातेच्या जयघोषात संपूर्ण शहर देशभक्तीच्या वातावरणाने न्हाऊन निघाले.

यात्रेची सुरुवात पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून झाली. पुढे आदर्श हॉटेल, विरुपाक्ष मंदिर, जय भारत नाका, टिळक रोड अशा मुख्य मार्गांवरून मार्गक्रमण करत स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे यात्रेचा समारोप झाला. संपूर्ण मार्गात ठिकठिकाणी नागरिकांनी यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले. यात्रेदरम्यान भारत माता की जय, वंदे मातरम आणि जय हिंदच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. पनवेलकर नागरिकांमध्ये देशभक्तीची ऊर्जा आणि एकात्मतेची भावना जागवणारा हा सोहळा अनेकांसाठी अविस्मरणीय ठरला.

या रॅलीत आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, श्रीनंद पटवर्धन, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर, पनवेल मंडल अध्यक्ष सुमित झुंजारराव, वर्षा ठाकूर, महिला मोर्चा अध्यक्ष्य रुचिता लोंढे, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, तेजस कांडपिळे, सुनील बहिरा, माजी नगरसेविका अनुराधा ठोकळ, हेमलता म्हात्रे, डॉ. सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, नीता माळी, सुलोचना कल्याणकर, नलिनी शेलार, संजय जैन, अमरीश मोकल, प्रीतम म्हात्रे, केदार भगत, रुपेश नागवेकर, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, विनायक मुंबईकर, स्वप्नील ठाकूर, के.सी.पाटील, रोहित जगताप, स्वाती कोळी, लीना पाटील, कोमल कोळी, आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते आणि प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले होते. उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व अधोरेखित करत देशभक्ती व एकात्मतेचा संदेश दिला. तसेच, नागरिकांना तिरंग्याचा सन्मान राखण्याचे आणि राष्ट्रहितासाठी एकजूट राहण्याचे आवाहन केले. हातात तिरंगा झेंडा, जवानांच्या गौरवार्थ अभिमान फलक, ढोलताशाचा गजर, देशभक्तीच्या घोषणा भव्य तिरंगा यात्रा ही पनवेलकरांसाठी अभिमानाचा क्षण ठरला. भाजप पनवेल शहर मंडलाच्या या तिरंगा यात्रेने पनवेलकर नागरिकांमध्ये देशभक्तीचा उत्साह आणि एकात्मतेची भावना अधिक दृढ केली. उपस्थितांच्या मनात ही यात्रा एक अभिमानाचा व अविस्मरणीय सोहळा म्हणून कायम राहणार आहे.

# स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण

## जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तीन नावीन्यपूर्ण डिजिटल उपक्रमांचा शुभारंभ





**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलीस मुख्यालय कवायत मैदानावर जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. त्यांनी जनतेला स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त डॉ. यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल आदी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, नागरिक व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार व धनादेश वितरण तसेच उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सेना दलात कार्यरत असताना वीरमरण आलेले शहीद जवान रामचंद्र लहू साठे (लोणी हवेली, ता. पारनेर), रामदास साहेबराव बढे (मेंढवण, ता. संगमनेर) व संदीप पांडुरंग गायकर (मु. पो. ब्राम्हणवाडा, ता. अकोले) यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ लाख रुपयांचा मदतीचा धनादेश देण्यात आला.

जिल्ह्यात मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत जीवाची पर्वा न करता दोन महिलांना व इतर नागरिकांना जीवनदान देणारे सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते, पोलीस कॉन्स्टेबल नितीन गांगुर्डे व अन्सार शेख यांचा विशेष सन्मान झाला. शंभर दिवसांच्या विशेष कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २३ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत जिल्ह्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ४९ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान झाला. जिल्हा शासकीय रुग्णालयातील १९ जिवंत अवयवदात्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ मध्ये राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या जिल्ह्यातील १८ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. जिल्हा परिषद आरोग्य विभागास शासनाकडून प्राप्त पाच शववाहिकांचे लोकार्पणही करण्यात आले.

या प्रसंगी पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिक तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तीन नाविन्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ :-

कार्यक्रमात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तीन डिजिटल उपक्रमांचा शुभारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते झाला. या उपक्रमांचा उद्देश नागरिकांशी थेट व तातडीचा संवाद अधिक मजबूत करणे आणि योजना अंमलबजावणीत पारदर्शकता वाढवणे हा आहे. 'जिल्हाधिकारी कार्यालय - संवाद सेतू' या सेवेमार्फत विविध विभागांच्या सेवा, आवश्यक कागदपत्रांची यादी व नजीकच्या सेतू केंद्रांची माहिती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने व्हॉट्सॲपवर मिळणार आहे. 'जिल्हाधिकारी कार्यालय व्हॉट्सॲप चॅनेल - आपलं शिवार' या अधिकृत चॅनेलद्वारे प्रशासनाची अद्ययावत माहिती, आपत्तीविषयक सूचना तसेच राज्य शासनाच्या उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत थेट पोहोचवली जाईल. याशिवाय, विशेष न्याय विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या अनुदानांच्या प्रगतीस्थितीची माहिती लाभार्थ्यांना मोबाईलवर पाहण्याची सुविधा उपलब्ध होईल, ज्यामुळे वेळ व खर्च वाचेल तसेच पारदर्शकता वाढेल. या उपक्रमांमुळे प्रशासन-नागरिक संवाद अधिक सुलभ व परिणामकारक होण्यास मदत होईल.

# प्री.पब्लिक स्कूल कांडळा येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**नायगांव । हनुमंत चंदनकर**

नायगांव तालुक्यातील कांडाळा येथील श्री दिगांबराव देशमुख रोसिंग एक्सलन्स प्री पब्लिक स्कूल येथे आज दिनांक १५ ऑगस्ट दिन मान्यवरांचे उपस्थित साजरा करण्यात आला. ध्वजारोहण व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री बाळासाहेब चोपडे साहेब ( पोलीस उपनिरीक्षक पुणे) यांच्या हस्ते प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे पूजन करून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री सर्जेरावजी देशमुख साहेब , प्रमुख उपस्थिती श्री ओम प्रसादजी देशमुख साहेब, श्री परसराम पाटील जाधव, तसेच श्री भाऊराव पाटील चव्हाण, श्री यशवंत पाटील कुराडे, श्री बालाजी कांडाळा माजी सरपंच कांडाळा, आजच्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असलेले आमच्या ताई पूजाताई चोपडे, आरती ताई देशमुख. मान्यवरांचे शब्दसमनाने स्वागत करून. विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये मध्ये प्रथम पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर करून सर्व उपस्थित आमची मने जिंकले. या नंतर एल.के.जी मधील श्रीशा संत्रे, प्रवीण बोडके, प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सरस्वती येरेवाड, मनोहर भेंडेकर, आरुषी पवार या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी या कार्यक्रमाला कांडाळा व धानोरा गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिंदे पी एम सर यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शिंपाळे सर व आभार श्री. खरटमोल सर मानले.

# नायगाव पंचायत समितीच्या वतीने संत ज्ञानेश्वर जयंती साजरी



**नायगाव । हनुमंत चंदनकर**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्त शतकोतर सुवर्ण जयंती महोत्सव ७५० वी जयंती सर्वत्र साजरी करण्याचे आदेश राज्य शासनाच्या वतीने सर्वत्र पारित केले असल्याने नायगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय मिरजकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढून जयंती साजरी करण्यात आली.

महाराष्ट्र भूमी ही संतांची भूमी म्हणून ओळख आहे कारण त्यांच्या पवित्र चरणांनी ही महाराष्ट्राची माती पावन झाली आहे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांचे कार्य अथांग आहे संताचे अनमोल विचार सर्वत्र रुजली जावेत आणि त्यांचे स्मरण व्हावे या उदात भावनेपोटी महाराष्ट्र शासनाने राज्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत अशा कार्यालयात श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीचे औचित्य साधून सर्वत्र सप्तशतकोतर सुवर्ण जयंती महोत्सव साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन तसे आदेश सर्वत्र पारित केले आहे त्या आदेशानुसार नायगाव पंचायत समिती येथे पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी आणि जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक वृंद यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या मूर्तीची पालखी मिरवणूक टाळ मृदंग विना आणि हरिनामाच्या गजरात सायंकाळी पाच ते सात वेळेत काढून जयंती महोत्सव साजरा केला आहे यावेळी शरचंद्र महाविद्यालयाचे प्राध्यापक बालाजी गायकवाड, ग्रामसेवक श्री पवळे यासह पंढरी नामवाडे, रामेश्वर गायकवाड,पंचायत समितीचे कर्मचारी श्री ठाकूर यासह अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# पनवेलमधील कातकरी वसाहती वरील अतिक्रमणे हटवण्याची मानवी हक्क संरक्षण फेडरेशनची मागणी



**पनवेल । प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील ओव्हे-कॅम्प, चौकवाडी येथील कातकरी वसाहतीमधील भूखंडांवरील अतिक्रमणे तात्काळ हटवण्याची मागणी मानवी हक्क संरक्षण फेडरेशनने पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे केली आहे. फेडरेशनच्या शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन या प्रकरणी सविस्तर निवेदन दिले. यावर आयुक्तांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे फेडरेशनने सांगितले. प्रभाग समिती 'अ' अंतर्गत येणाऱ्या ओव्हे-कॅम्प, चौकवाडी येथील कातकरी वसाहतीमधील भूखंड क्रमांक १८ वर काही व्यक्तींनी बेकायदेशीर बांधकामे करून अतिक्रमण केल्याची तक्रार रवि गणु काकतकरी आणि नागेश रवि काकतकरी यांनी यापूर्वीच पालिकेकडे केली होती. त्यांनी भूखंडाचा ७/१२ उतारा, फेरफार नोंद आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर केली होती.

या प्रकरणाची गांभीर्य लक्षात घेऊन मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या एका शिष्टमंडळाने राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मुनीर तांबोळी यांच्या नेतृत्वाखाली थेट पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्तांची भेट घेतली. फेडरेशनने आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, ही अतिक्रमणे अजूनही अस्तित्वात असून, त्यामुळे स्थानिक कातकरी समाजाच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत आहे. फेडरेशनने पालिकेला तातडीने चौकशी करण्याचे आणि सदर अतिक्रमणे त्वरित हटवण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

या आश्वासनानंतर आता अतिक्रमण कधी हटवले जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. प्रशासनाच्या पुढील कारवाईवरच कातकरी समाजाला न्याय मिळणे अवलंबून आहे. शिष्टमंडळात मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मुनीर तांबोळी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर कच्छी, जेष्ठ पत्रकार विकास पाटील, कार्यालयीन प्रमुख सुरज नागे आणि आदिवासी समाज बांधव उपस्थिती होते.

# भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिना निमित्त ;विधान भवन येथे ध्वजारोहण



**मुंबई । प्रतिनिधी**

विधान भवन, मुंबई येथे आज भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती मा.प्रा.राम शिंदे यांच्या शुभहस्ते, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती मा.डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे व महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते मा. श्री. अंबादास दानवे याच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.या प्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (२) श्रीमती मेघना तळेकर, सचिव (३) डॉ. विलास आठवले, सचिव (४) श्री. शिवदर्शन साठचे यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विधानमंडळाचे मुख्य सुरक्षा अधिकारी श्री. राजू भुजबळ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने यावेळी मानवंदना दिली. या प्रसंगी मा. सभापती यांनी संबोधित करतांना भारताच्या शूर सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. दहशतवाद्यांचे तळ उद्धस्त करीत राबविलेल्या ऑपरेशन सिंदूर बद्दल त्यांनी भारतीय सैन्याचे अभिनंदन केले. तसेच भारताला सामर्थ्यशाली आणि वैभवशाली बनविण्याचा आपल्या सर्वांचा संकल्प सिद्धीस जावा अशी मनोकामना व्यक्त करुन भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळाच्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तूला करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने या वास्तूचे सौंदर्य उजळून निघाले आहे.

# ज्ञानांकुर इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा

**रायगड । प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील खांब विभागातील इंग्रजी शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य मंजुळा वेल्फेअर अँड सोसायटीच्या ज्ञानांकुर इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मागील तीन दिवस शाळेत 'तिरंगा दिवस' म्हणून साजरे करण्यात आले. संपूर्ण शाळा विद्यार्थ्यांनी सजविलेल्या विविध ज्ञान-विज्ञान प्रतिकात्मक कला आणि रंगीबेरंगी फुलांनी उजळून निघाली होती.

विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांच्या वेशभुषा अंगावर घेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. ध्वजारोहण, राष्ट्रगान, राज्यगान तसेच परेडहिटद्वारे पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. देशभक्तीपर गीत गायन आणि विविध कलासादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.खांब विभागातील सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणप्रेमी महाराष्ट्र विद्युत महामंडळातून निवृत्त ह.भ.प. ज्ञानेश्वर लोखंडे यांच्या शुभहस्ते या शाळेचा ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र लोखंडे, ह.भ.प. नारायण महाराज लोखंडे, संचालक डॉ. श्यामभाऊ लोखंडे, दिलीप मोहिते, पालक तुकाराम कोंडे, संतोष महाडिक, गणेश कोस्तेकर, प्रदीप मरवडे, सचिन गोळे, विक्रांत गुरव, सूर्यकांत पोटफोडे, अमित भोईर, प्रवीण पोटफोडे, हरिश्चंद्र लोखंडे, महेंद्र वाघमारे, आरती तुपकर, प्रकाश कोकाटे, अर्चना परबळकर, माधवी चितळकर, शाळेच्या मुख्याध्यापिका रिया लोखंडे, उपशिक्षिका सोनाली शिंदे, रुपाली मरवडे, प्रियांका चिकने, प्रतीक्षा धामणसे, सायली म्हात्रे, जान्हवी महाडिक, दर्शना धनवी, क्रिडा शिक्षक ज्ञानेश्वर महाडिक, निलेश टवळे, श्रुती वाजे आदी विद्यार्थी, शिक्षक व पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



## शिवसेनेकडून 'लाडक्या बहिणींना' न्याय

# तळोद्यात भव्य रक्षाबंधन सोहळा पाच हजार महिलांना भेटवस्तूंचे वाटप

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शिवसेनेने महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवून त्यांना खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे, असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी तळोदा येथे आयोजित शिवसेनेच्या महिला मेळाव्यात केले. शिवसेनेचे ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे धोरण असून, त्यानुसार महिलांच्या अडचणी सोडवून त्यांना न्याय देण्याचे काम तळोदा येथील पदाधिकारी करत आहेत, असेही त्यांनी सांगितले.तळोदा शहरातील माळी समाज मंगल कार्यालयात शनिवारी (दिनांक १६) रोजी आयोजित भव्य रक्षाबंधन सोहळ्याला हजारो महिलांनी गर्दी केली होती. यावेळी बोलताना मंत्री गुलाबराव पाटील यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या 'लाडकी बहीण योजना', 'लखपती दीदी योजना', महिलांना प्रवासात सवलत आणि मुलींना मोफत शिक्षण यांसारख्या योजनांचा उल्लेख केला. या योजनांमुळे अनेक गरीब महिलांना मोठा आधार मिळाला असल्याचे त्यांनी नमूद केले. शिवसेनेच्या या प्रयत्नांमुळेच महिलांचा विश्वास वाढला असून, रक्षाबंधनाच्या सोहळ्याला महिलांची प्रचंड गर्दी






उसळली आहे, असेही ते म्हणाले.विधानसभेचे आमदार आमशा पाडवी यांनी तळोद्यातील शिवसैनिकांच्या कामाची प्रशंसा केली. 'लाडकी बहीण योजने'चा लाभ तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत गरीब महिलांपर्यंत पोहोचवला आणि भावाचे नाते जपले, असे ते म्हणाले. त्यांनी तळोद्यातील शिवसैनिकांनी केलेल्या कामाचे कौतुक करताना, एवढ्या मोठ्या प्रमाणात भेटवस्तू कुठून आणतात, याबद्दल आश्चर्य व्यक्त केले.

या भव्य सोहळ्याला मंत्री गुलाबराव पाटील, आमदार आमश्या पाडवी आणि आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्यासह उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख भाऊसाहेब चौधरी, जिल्हाप्रमुख गणेश पराडके, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख कविता चौधरी आणि इतर प्रमुख नेते उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेच्या समाजकारणावर विश्वास दाखवून शिवबंधन बांधले. तळोद्यातील शिवसेना नेते गौतम जैन, तालुकाध्यक्ष अनुप उदासी, जितेंद्र दुबे, हितेंद्र क्षत्रिय आणि संदिप परदेशी यांचे मंत्री गुलाबराव पाटील आणि आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी विशेष कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जितेंद्र दुबे यांनी केले, तर सूत्रसंचालन अविनाश माळी यांनी केले. हा कार्यक्रम दिवसभर शहरात चर्चेचा विषय ठरला.

## जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांच्या हस्ते मांजरा धरणाचे जलपूजन संपन्न

**केज । प्रतिनिधी**

धनेगाव येथील केज सह अंबाजोगाई, लातूर येथील जलवाहीनी समजले जाणारे मांजरा धरण पुर्ण क्षमतेने भरले आहे. हा एक सर्व शेतकरी बांधवांसाठी आनंदाची बाब असून शेतकरी बांधववर निसर्गाची कृपा कायम रहावी असे उद्गार रमेशराव आडसकर यांनी धनेगाव येथील मांजरा धरणाच्या जलपूजन करते वेळी व्यक्त केले. मागील काही दिवसांत भरपूर पाऊस झाल्याने अनेक शेतकर्यांचे पिक गेले आहेत. त्यांचे पंचनामे करणे सुरू आहे. मी स्वतः उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भेटून पिडीत शेतकर्यांना मदत मिळावी यासाठी प्रयत्न करणार आहे. असेही रमेशराव आडसकर यांनी उपस्थित शेतकरी यांना आश्वासनं दिले. तसेच मांजरा धरण भरले आहे. व पाऊस



काळ चांगला झाला आहे. त्यामुळे उसाचे पिक चांगले रहाणार आहे. अंबा सहकारी साखर कारखाना परिसरातील सर्व उस नेण्यासाठी तत्पर असून चांगला भाव देण्याची हमी देखील रमेशराव आडसकर यांनी दिली आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे. मांजरा धरणाच्या जलपूजन प्रसंगी रमेशराव आडसकर यांच्या सोबत अंकुश अण्णा इंगळे कृ. उ. बा. स. सभापती केज, ऋषीकेष भैय्या आडसकर, राजाभाऊ अवताडे रा. कॉ. ता. अंबाजोगाई, बालासाहेब शेप सरपंच, अमर भैय्या पाटील रा. कॉ. पा. ता. अ. केज, संभाजी इंगळे, खोडसे मामा, तपसे, काळदाते यांच्या सह शेतकरी कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजकीय हक्कासाठी रिपाइंचा संकल्प मेळावा-दीपक कांबळे

**केज । प्रतिनिधी**

उपेक्षित घटकांच्या राजकीय हक्कासाठी रिपाइं (ए) च्या वतीने केज येथे संकल्प मेळावा आयोजित केला असून या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केज तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी केले.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशाने आणि युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे,मराठवाड्याचे नेते मजहर खान आणि जिल्हा सचिव राजू जोगदंड यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२५ ऑगस्ट रोजी केज येथे मुक्ताताई लॉन्स येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.)चा संकल्प मेळावा आयोजित केला आहे त्या निमीत दि.१७ ऑगस्ट रोजी तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी माहिती




देण्यासाठी केज येथील शासकीयविश्रामगृहावर पत्रकार परिषद आयोजित केली होती. या वेळी संवाद साधताना दीपक कांबळे म्हणाले की, स्वातंत्र्य मिळून देशाला ८९ वर्ष झाली तरी उपेक्षित आणि वंचित घटकांना खऱ्या अर्थाने राजकीय न्याय मिळत नाही.आरक्षण हे केवळ नावालाच असून आरक्षणाच्या आडून त्याचा गैरवापर होत आहे.त्यासाठी संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला आहे. आता आम्ही उपेक्षित घटकांच्या हक्कासाठी संघर्ष करणार असून देशाचे सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले आणि पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली लढा उभारण्याचे त्यांनी संकेत दिले. शेवटी त्यांनी मेळावा यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे आणि जास्तीत जास्त संख्येने आपल्या न्याय व संवैधानिक मागण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## नंदुरबारमध्ये तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना; महाराष्ट्रातील दुसरे असे कार्यालय

**नंदुरबार । दिपक गोसावी**

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने नंदुरबार जिल्ह्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते समाजकल्याण कार्यालयात तृतीयपंथी कक्षा चे उद्घाटन करण्यात आले. हे कार्यालय तृतीयपंथी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या तक्रारींचे निवारण आणि शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी काम करेल.

जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा कक्ष, तृतीयपंथीयांना संजय गांधी निराधार योजना, घरकुल योजना, आबा कार्ड, आरोग्य विमा योजना, कौशल्य विकास



प्रशिक्षण अशा विविध योजनांचा १००% लाभ मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवतो. या व्यतिरिक्त शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक समावेश यासाठीही हे कक्ष महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, उपविभागीय अधिकारी व सहाय्यक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, सहाय्यक आयुक्त सुंदरसिंग वसावे, तसेच नीती आयोगाचे प्रतिनिधी षण्मुख सोनवणे व वैष्णवी रामडोहकर यांची विशेष उपस्थिती होती.राज्यात अशा प्रकारचा हा दुसरा स्वतंत्र कक्ष असून, नंदुरबार जिल्ह्यासाठी हा एक ऐतिहासिक क्षण आहे. या उपक्रमासाठी समाज कल्याण विभागासोबत विघ्नहर्ता, नवचैतन्य फाउंडेशन, नवनिर्माण, आणि सी. वाय डी. ए.यांसारख्या सामाजिक संस्थांनी सहकार्य केले. या वेळी शासन आणि सामाजिक संस्था एकत्र येऊन तृतीयपंथी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## बारामती पंचायत समितीच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील १०१ गरजू विद्यार्थीनींना मोफत सायकल वाटप



**बारामती । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनी पुणे जिल्हा परिषदेच्या उपक्रमांतर्गत बारामती पंचायत समितीच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील १०१ गरजू विद्यार्थीनींना मोफत सायकल वाटप करण्यात आले. या वेळी राज्यसभेचे खासदार सुनेत्रा वहिनी पवार यांनी विद्यार्थीनींना आणि पालकांना संवाद साधला. समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहभागातून हा उपक्रम राबवला जात असून गरजू विद्यार्थीनीं साठी हा उपक्रम फायदेशीर ठरत आहे. या पुढील काळात ही अशाच पद्धतीनं समाजातील उपेक्षित घटकांना आधार देण्याचं काम केले जाईल राज्यसभेचे खासदार सुनेत्रा वहिनी पवार यांनी अशी ग्वाही या निमित्तानं दिली.

## श्री.संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

श्री.संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील विठ्ठल मंदिर श्री.संत सेना महाराज समाज भवन,जव्हेरी गल्ली, कबाड गल्ली येथे दि.२० ऑगस्ट रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सकाळी ०८:०० वा.महापूजेला सुरुवात होणार असून दुपारी १२: ०० वा.महाआरती होईल. आरती नंतर महाप्रसादाला सुरुवात होणार असून सर्व समाज बांधवांनी पुण्यतिथी सोहळ्यास उपस्थित राहून महाआरती व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन सुनील काळे, दीपक दोडके, किरण काळे, महेश दोडके, अक्षय काळे, अशोक दोडके, गजानन दोडके, गणेश काळे, श्रीकांत साळुंखे, नितीन दोडके, अनिल सरडे, जगदीश वखरे, जिवा वाघमारे यांनी केले आहे.



## स्वातंत्र्य दिनानिमित्त भरपावसात तळेगाव ग्रा.पं.येथे अवयदान प्रतिज्ञा

**तळेगाव । प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट २०२५ वार शुक्रवार रोजी ग्रामपंचायत तळेगाव येथे प्रथम ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला सरपंच माननीय श्रीमती अश्विनीताई उद्धव घोलप यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाला नंतर आरोग्य विभाग प्राथमिक आरोग्य केंद्र राजुरी नवगण उपकेंद्र तळेगावच्या वतीने आरोग्य सेवक नितीन महूवाले यांनी पुढील अवयवदान प्रतिज्ञा घेतली समस्त ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी वर्ग व गावकरी मंडळी यांच्या उपस्थितीत अवयवदान प्रतिज्ञा- माणुसकी हा माझा धर्म आहे पीडितांच्या व गरजूंच्या जीवनात आनंद हीच माणुसकीची खरी शिकवण



आहे अशी माझी श्रद्धा आहे अवयवदानामुळे गरजू रुग्णांच्या जीवनात आनंद फुलविणे शक्य होते तसेच मुत्यूपंथाला लागलेल्या व्यक्तीला नवा जन्म देता येतो त्यामुळे सर्वात मोठे पुण्यकर्म आहे यावर माझा विश्वास आहे , मी प्रतिज्ञा करीत आहे की माझ्या शरीरात जे जे अवयव दुसऱ्या मानवाच्या जीवनात आनंद फुलू शकतील अशा अवयवावर माणुसकीचा पहिला हक्क व अधिकारी असेल माझ्या अवयवाचा अशा माणुसकीच्या पुण्य कार्यासाठी उपयोग झाला पाहिजे असा माझा आग्रह आहे माझ्या पुढील पिढ्यांनी या आग्रहाचा मान राखावा म्हणून त्यांना सतत स्मरण देत राहील आणि पुढील पिढ्यावर असेच संस्कार घडवित यासाठी मी प्रयत्नशील राहीन अशा प्रकारची प्रतिज्ञा नितीन महुवाले यांनी घेतली व सर्वांनी प्रतिसाद दिला ,

उपस्थित मान्यवर ग्रामसेवक अचूतराव चाळक , तलाठी श्रीमती खेडकर मॅडम , सरपंच श्रीमती अश्विनीताई उद्धव घोलप, उपसरपंच अशोक मस्के , सदस्य गणेश मुंजाळ , श्रीराम घोलप, सत्यवान घोलप , कर्मचारी प्रकाश साबळे , शिक्षक वर्ग मा सरवदे , आरोग्य विभाग डॉ तनुजा शेटे , आ सेविका श्रीमती कदम , आ सेविका श्रीमती शेलार , तसेच अंगणवाडी सेविका ,मदतनिस आदी मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077